महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – 440 022
दूरध्वनी क्र.0712- 2959381 CIN No. U85300PN2019NPL187405 ई-मेल: mahajyotingp@gmail.com

कृपया प्रकाशनार्थ

दिनांक - 26 डिसेंबर 2023

# सब रजिस्टार व एसटीआय पदावर ‘महाज्योती’च्या 15 विद्यार्थ्यांची निवड

राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाची स्वायत्त असलेली महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) नागपूर ही राज्यातील ओबीसी, व्हिजेएनटी व एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) द्वारे 2022-23 वर्षात घेण्यात आलेल्या सब रजिस्टार म्हणजे उपनिबंधक (ग्रेड-1) मुद्रांक निरीक्षक आणि एसटीआय म्हणजे राज्य कर निरीक्षक परीक्षेच्या निकालात महाज्योतीच्या 15 विद्यार्थी उत्तीर्ण होऊन त्यांनी घवघवीत यश प्राप्त केले. गेल्या चार वर्षांपासून दर्जेदार प्रशिक्षण तसेच विद्यावेतनातून त्यांना अर्थसहाय्याचे पाठबळ देण्याचे मोलाचे कार्य संस्था करीत आहे. विद्यार्थांना उत्तम प्रशिक्षण दिल्यामुळेच ओबीसी विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याची माहिती महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. राजेश खवले यांनी दिली.

एमपीएससीच्या सब रजिस्टार पदाची तब्बल 12 वर्षानंतर परिक्षा घेण्यात आली होती. यात 35 जागा ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी होत्या. महाज्योती अंतर्गत ज्ञानदीप अकादमीचे 8 विद्यार्थी उत्तीर्ण होत त्यांनी यश प्राप्त केले आहे. तसेच 77 पदांसाठी राज्य कर निरीक्षक (एसटीआय) परीक्षेत ओबीसी प्रवर्गासाठी 36 जागा होत्या. यात ज्ञानदीप अकादमीचे 7 विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विद्यार्थांना उत्तम प्रशिक्षण दिल्यामुळेच महाज्योतीचे 15 ओबीसी विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याची माहिती श्री. राजेश खवले यांनी दिली.

शिक्षणाचे महत्व अबाधित आहे. शिक्षणामुळेच आपले स्वप्नांची दारांची चावी मिळविता येते. यानंतरच भविष्यात यशस्वी करियर घडविण्याचा मार्ग मोकाळा होत असतो. यानंतर विद्यार्थ्यांना शासन सेवेत योग्य ती संधी उपलब्ध करून देण्याचे कार्य हे ‘महाज्योती करीत आहे. दर्जेदार प्रशिक्षणातूनच दिसून येत असल्याचा विश्वास श्री. राजेश खवले यांनी व्यक्त केले. महाज्योतीचे अध्यक्ष तथा इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री मा. श्री. अतुल सावे यांनी महाज्योतीमार्फत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचे अभिनंदन केले असून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – 440 022
दूरध्वनी क्र.0712- 2959381 CIN No. U85300PN2019NPL187405 ई-मेल: mahajyotingp@gmail.com

# यशस्वी झालेले विद्यार्थ्यांची नावे खालील प्रमाणे

| अ. क्र | विद्यार्थ्याचे नाव | परीक्षेचे नाव | प्रशिक्षण संस्था |
|---|---|---|---|
| 1 | सागर राजेंद्र राऊत | एमपीएससी (सब रजिस्टार) | ज्ञानदीप अकादमी |
| 2 | आरती त्र्यंबक नागरगोजे | एमपीएससी (सब रजिस्टार) | ज्ञानदीप अकादमी |
| 3 | वैभव दत्तात्रये गवारे | एमपीएससी (सब रजिस्टार) | ज्ञानदीप अकादमी |
| 4 | अमोल नाना डोंगरे | एमपीएससी (सब रजिस्टार) | ज्ञानदीप अकादमी |
| 5 | विजय ईश्वर फळ | एमपीएससी (सब रजिस्टार) | ज्ञानदीप अकादमी |
| 6 | गणेश लोखंडे | एमपीएससी (सब रजिस्टार) | ज्ञानदीप अकादमी |
| 7 | सूरज सावता माळी | एमपीएससी (सब रजिस्टार) | ज्ञानदीप अकादमी |
| 8 | दिपाली दत्तात्रय लंगोटे | एमपीएससी (सब रजिस्टार) | ज्ञानदीप अकादमी |
| 9 | अमित महादू जाधव | एमपीएससी (एसटीआय) | ज्ञानदीप अकादमी |
| 10 | वैभव दत्तात्रय गवारे | एमपीएससी (एसटीआय) | ज्ञानदीप अकादमी |
| 11 | स्वप्निल रत्नाकर तायडे | एमपीएससी (एसटीआय) | ज्ञानदीप अकादमी |
| 12 | गणेश लोखंडे | एमपीएससी (एसटीआय) | ज्ञानदीप अकादमी |
| 13 | अमोल नाना डोंगरे | एमपीएससी (एसटीआय) | ज्ञानदीप अकादमी |
| 14 | सुरज सावता माळी | एमपीएससी (एसटीआय) | ज्ञानदीप अकादमी |
| 15 | अमृता रामभाऊ ढेकले | एमपीएससी (एसटीआय) | ज्ञानदीप अकादमी |

प्रति,
मा. संपादक
प्रिंट, ईलेक्ट्रॉनिक, डिजीटल माध्यम
महोदय,
उपरोक्त वार्तांकन आपल्या लोकप्रिय माध्यमात प्रसिद्धी करावे.

कुणाल शिरसाठे
प्रकल्प व्यवस्थापक
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती),
महाराष्ट्र राज्य, नागपूर